# जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी सांगली यांचे कार्यालय

पत्ता- विजयनगर, सांगली,

Ph.No. 0233-2600185 E-mail- collectorsangligb@gmail.com

---

क्र. साशा-1/प्रशा/आरआर/1238/2018 दिनांक 30.07.2018

विषय- सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणूक 2018 मतदानादिवशी सार्वजनिक सुट्टी जाहिर करणेबाबत.

## आदेश

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणूक 2018 करीता राज्य निवडणूक आयोग यांनी बुधवार दिनांक 01 ऑगस्ट 2018 रोजी मतदान दिवस निश्चित केलेला आहे. त्याअनुषंगाने महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय मुंबई यांचेकडील असाधारण राजपत्र क्र.53 दि.27 जुलै 2018 रोजीचे शासन राजपत्राअन्वये सांगली मिरज व कुपवाड महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्राकरीता दि.01 ऑगस्ट 2018 रोजी सार्वजनिक सुट्टी जाहिर करणेत आलेली आहे.

महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय मुंबई यांचेकडील असाधारण राजपत्र क्र.53 दि.27 जुलै 2018 रोजीचे शासन राजपत्राअन्वये सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील सर्व महाराष्ट्र शासनाचे कार्यालयासाठी तसेच सर्व निमशासकिय कार्यालयांसाठी बुधवार दिनांक 01 ऑगस्ट 2018 रोजी मतदान दिवशी सार्वजनिक सुट्टी जाहिर करणेत येत आहे.

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील सर्व शासकिय कार्यालये, निमशासकिय कार्यालयातील विभाग प्रमुख/ खातेप्रमुख/जिल्हा प्रमुख यांनी त्यांचे कार्यालयातील सर्व अधिकारी/ कर्मचारी यांना तसेच प्रशासकिय नियंत्रणाखालील सर्व दुय्यम कार्यालयातील कर्मचा-यांना उपरोक्त सुट्टी कळविणेबाबत आवश्यक ती कार्यवाही करावी.

30.07.18

(वि.ना.काळम)
जिल्हाधिकारी सांगली

प्रति,

सर्व विभाग प्रमुख/ खाते प्रमुख/ शाखा प्रमुख

प्रत – जिल्हा माहिती अधिकारी सांगली यांना व्यापक पसिध्दीकामी